माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ९०८/२०२२**

**अपिलार्थी, श्री. अमर भालचंद्र वासनिक**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (गृह),**
पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा, ता. जि. भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक**
भंडारा ता. ज़ि. भंडारा

**जन माहिती अधिकारी तथा मोटार वाहन निरीक्षक,**
उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा, ता. जि. भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी**
उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, प्रशासकीय इमारत राष्ट्रीय महामार्ग क्र.६, भंडारा, ता.जि.भंडारा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.१०.२०२३**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०८.२०२१ | ०६.०९.२०२१ (हस्तांतरीत) व २९.०९.२०२१ | १२.११.२०२१ | १५.०६.२०२३ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी, पोलीस उप अधिक्षक (गृह) भंडारा यांच्याकडे **दिनांक २६.०८.२०२१** रोजी ऑनलाईन माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " सन २०२० ते ०१ नोव्हेंबर २०२१ च्या दरम्यान आपल्या कार्यालयातुन किती स्कूल बस, प्रवासी बस यांची नोंदणी करण्यात आली. प्रत्येक स्कूल बस च्या मालकांचे नाव व पत्ता तसेच प्रवासी बस च्या मालकांचे नाव व पत्ता द्यावा. प्रत्येक स्कूल व प्रवासी बस ची आसन क्षमता किती आहे. प्रत्येक स्कूल बस व प्रवासी बस कडून किती व्यवसाय कर, रोड टॅक्स व अन्य कर भरून घेण्यात आले. तपशिलवार माहिती देण्यात यावी " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा प्र.पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा यांनी दिनांक ०६.०९.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केला व त्याची प्रत अपिलार्थीस पाठविलेली आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय भंडारा यांनी

दिनांक २९.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागितलेली माहिती स्कुल बस, प्रवासी बस यांची नोंदणी तसेच मालकाचे नाव व पत्ता, प्रवासी आसन क्षमता इत्यादी बाबतची माहिती या कार्यालयाच्या अभिलेखावर विस्तृत स्वरुपाची असल्याने व कार्यालयात मनुष्यबळ पुरेसा नसल्याने सदरची माहिती आपणास पूरविणे शक्य नाही. आपणास हवी असलेल्या माहितीचे अवलोकन करण्याकरीता दिनांक व वेळ निश्चित करुन तसे या कार्यालयास अवगत करावे. जेणे करुन सदर माहिती निरीक्षणाकरीता आपणास उपलब्ध करुन देणे शक्य होईल. तसेच पाहिजे असलेल्या माहितीकरीता विहीत शुल्काचा भरणा करुन आपणास प्राप्त करुन घेता येईल, असे अपिलार्थीस कळविले.

त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक १२.११.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा यांचेकडे "माहिती न मिळाल्यामुळे " असे कारण नमूद करुन ऑनलाईन प्रथम अपील दाखल केले. सदर प्रथम अपील अर्ज प्रथम अपिलीय अधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा यांच्या वतीने दिनांक ०५.०६.२०२३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा यांचेकडे हस्तांतरीत केलेला आहे व त्याची प्रत अपिलार्थीस दिलेली आहे. त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिकं परिवहन अधिकारी, भंडारा यांनी दिनांक १५.०६.२०२३ रोजी सुनावणी घेवून खालीलप्रमाणे सविस्तर आदेश पारीत केले आहे.

"1)अपिलकर्ता यांनी अपील अर्जासाठीचे विहीत शुल्क भरले असल्याचा पुरावा सादर केला नाही. तथापि त्यांनी ऑनलाई अर्ज दाखल करताना शुल्क भरले असल्याचे नमूद केल्याने ते ग्राहय धरुन न्यायोचित दृष्टीकोनातून सुनावणी घेण्यात आली. २) जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना विहीत वेळेत पत्र देऊन माहितीचे अवलोकन करण्याची संधी दिल्याचे निदर्शनास येते. अपिलार्थी यांनी त्यानंतर कार्यालयाशी संपर्क साधून परस्पर सहमतीने दिनांक ०८.१२.२०२१ रोजी माहितीचे निरीक्षण करण्याची वेळ निश्चित केल्याचे दिसते. तथापि त्यांनी सदर दिवशी ठरल्याप्रमाणे माहितीचे निरीक्षण करण्याची संधी न घेता त्यापूर्वीच म्हणजे दि. १२.११.२०२१ रोजी ऑनलाईन अपील पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा यांचेकडे सादर केल्याचे आढळते. सदर वस्तुस्थिती लक्षात घेता अपिलार्थी यांनी ठरल्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन न घेता परस्पर प्रथम अपील दाखल केले आहे. सदर अपील त्यांनी या कार्यालयाकडे दाखल न करता ऑनलाईन पध्दतीने पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा यांचेकडे दाखल केले असून अपील अर्जाचे शुल्क भरल्याचा पुरावा उपलब्ध नाही. करीता अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी संधी देऊनही सदर माहिती प्राप्त करुन घेण्यास रस नसल्याचे आढळून येते. करीता सदर अपील जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राहय धरुन निकाली काढण्यात येत आहे."

तत्पूर्वीच अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे **दिनांक २२.०३.२०२२ रोजी** " प्रथम अपिलाचे प्रतिसाद मिळाले नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ३०.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक ११.१०.२०२३ रोजी माहिती अधिकार सप्ताहाचे औचित्य साधून आयोगाकडे प्राप्त भंडारा जिल्हयाशी संबंधित व्दितीय अपीलाची सुनावणी जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथे आयोजित करण्यात आलेली आहे. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मोटार वाहन निरीक्षक, श्री. सतिश जाधव उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी

तथा मोटार वाहन निरीक्षक, श्री. वाहिद चाऊस उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक भंडारा यांचेतर्फे श्री. सचिन पवार, प्र. पोलीस उपअधिक्षक (गृह) भंडारा उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती लक्षात घेवून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद प्रथमदर्शनी सुसंगत असा आढळून येतो. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७(९) नुसार माहितीचे अवलोकन करुन माहिती प्राप्त करुन घेणे अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.०९.२०२१ रोजीच्या प्रतिसादात मागितलेली माहिती स्कुल बस, प्रवासी बस यांची नोंदणी तसेच मालकाचे नाव व पत्ता, प्रवासी आसन क्षमता इत्यादी बाबतची माहिती या कार्यालयाच्या अभिलेखावर विस्तृत स्वरुपाची असल्याने व कार्यालयात मनुष्यबळ पुरेसा नसल्याने सदरची माहिती पूरविणे शक्य नाही. तरी हवी असलेल्या माहितीचे अवलोकन करण्याकरीता दिनांक व वेळ निश्चित करुन तसे या कार्यालयास अवगत करावे. जेणे करुन सदर माहिती निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देणे शक्य होईल, असे नमूद केले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद हा माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७(९) नुसार योग्य असल्याचे आढळून येते. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १५.०६.२०२३ रोजीच्या आदेशात नोंदविलेले निरीक्षण म्हणजेच अपिलार्थी यांनी कार्यालयाशी संपर्क साधून परस्पर सहमतीने दिनांक ०८.१२.२०२१ रोजी माहितीचे निरीक्षण करण्याची वेळ निश्चित केल्याचे दिसते. तथापि त्यांनी सदर दिवशी ठरल्याप्रमाणे माहितीचे निरीक्षण करण्याची संधी न घेता त्यापूर्वीच म्हणजे दि. १२.११.२०२१ रोजी ऑनलाईन अपील पोलीस अधिक्षक कार्यालय, भंडारा यांचेकडे सादर केलेले आहे. त्यामुळे अपिलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी संधी देऊनही सदर माहिती प्राप्त करुन घेण्यास रस नसल्याचे आढळून आल्याने अपील निकाली काढले आहे.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांना वरील माहिती प्राप्त करुन घेण्यास अद्यापही स्वारस्य असल्यास जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क व समन्वय साधून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत, कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप होणार नाही, याची खातरजमा बाळगून तसेच मुळ दस्ताऐवजांना हानी पोहचणार नाही, याची काळजी घेवून संबंधित नस्तीचे अवलोकन प्राप्त करुन घ्यावे. त्यानुसार अवलोकनाअंती अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सशुल्क प्रदान करण्यात यावी, या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग ★ नागपूर ★

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ११.१०.२०२३**

23 NOV 2023

जावक क्रमांक --E823--- दिनांक ------------------------